**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२०/०८/२०११

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.०३ गुरूवार दि.२५/०८/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**गुरूवार दिनांक-२५/०८/२०११ ची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ३३ | अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी यांचे इयत्ता १० वी व १२ च्या परिक्षेत प्रथम प्रयत्नात ७० टक्के पेक्षा जादा गुण मिळवुन उत्तीर्ण झालेल्या मुलांना महापौर पारितोषिक म्हणून वाढीव बक्षीस रक्कम ठरविणेस व ती त्यांना देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३४ | श्री. अनिल बाबुराव घोडके, बिगारी यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर दिनांक १/१०/२०११ ते दिनांक ३०/९/२०१२ या १२ महिन्याचे कालावधी करिता मा.शासनाचे दिनांक१९/४/२०११ चे परिपत्रकातील अटी नुसार जकात ठेक्याची देकार रक्कम रूपये ६०,९६,१५,०००/- निश्चित करून अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

सोबत- विषय क्र. ३३ ते ३५ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०३**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२५/०८/२०११

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा क्र. ०३ गुरूवार दि.२५/०८/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता बोलविण्यांत आलेली व **भारत बंद मुळे तहकुब करण्यांत आलेली मा. स्थायी समिती सभा क्रमांक ३ शुक्रवार दिनांक २६/८/२०११ रोजी दुपारी १.०० वा** प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** सदर सभेच्या अजेंडया वरील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**गुरूवार दिनांक-२५/०८/२०११ ची तहकुब करण्यांत आलेल्या व शुक्रवार दिनांक २६/८/२०११ रोजी होणा-या सभेची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ३३ | अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी यांचे इयत्ता १० वी व १२ च्या परिक्षेत प्रथम प्रयत्नात ७० टक्के पेक्षा जादा गुण मिळवुन उत्तीर्ण झालेल्या मुलांना महापौर पारितोषिक म्हणून वाढीव बक्षीस रक्कम ठरविणेस व ती त्यांना देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३४ | श्री. अनिल बाबुराव घोडके, बिगारी यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर दिनांक १/१०/२०११ ते दिनांक ३०/९/२०१२ या १२ महिन्याचे कालावधी करिता मा.शासनाचे दिनांक१९/४/२०११ चे परिपत्रकातील अटी नुसार जकात ठेक्याची देकार रक्कम रूपये ६०,९६,१५,०००/- निश्चित करून अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०३**

विषय क्रमांक-३३ शुक्रवार दिनांक २६/८/२०११

ठराव क्रमांक- ३३ शुक्रवार दिनांक २६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी यांचे इयत्ता १० वी व १२ च्या परिक्षेत प्रथम प्रयत्नात ७० टक्के पेक्षा जादा गुण मिळवुन उत्तीर्ण झालेल्या मुलांना महापौर पारितोषिक म्हणून वाढीव बक्षीस रक्कम ठरविणेस व ती त्यांना देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अहमदनगर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभाग दि.२५/७/२०११

विषय- महानगरपालिका कर्मचारी यांचे पाल्यांना प्रोत्साहनपर महापौर पारितोषिक देणे बाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट की, मा.स्थायी समिती ठराव क्र.३ दि.१६/०६/२००८अन्वये अहमदनगर महानगरपालिकेचे कर्मचा-यांचे मुलांना इयत्ता १० वी व १२ च्या परिक्षेत प्रथम प्रयत्नात पास होवून शेकडा ७०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादी मध्ये खालील प्रमाणे महापौर पारितोषिक म्हणून अदा केले जाते.

| अ.क्र. | इयत्ता १० वी (किमान ७०% किंवा त्यापेक्षा जादा गुण मिळविणा-या विद्यार्थ्याचे यादी मधील क्रमानुसार) | रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रथम पारितोषिक | रू.२१००/ |
| २ | द्वितीय पारितोषिक | रू.१५००/- |
| ३ | तृतीय पारितोषिक | रू. १०००/- |

००००

| अ.क्र. | इयत्ता १२ वी (किमान ७०% किंवा त्यापेक्षा जादा गुण मिळविणा-या विद्यार्थ्याचे यादी मधील क्रमानुसार) | रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रथम पारितोषिक | रू.३१००/- |
| २ | द्वितीय पारितोषिक | रू.२१००/- |
| ३ | तृतीय पारितोषिक | रू.१५००/- |

मार्च २०१० च्या परिक्षेमध्ये वरील योजनेनुसार महापौर पारितोषिकाची रक्कम संबंधीत विद्यार्थी यांना अदा करणेच्या कार्यक्रमाच्या वेळी सद्य परिस्थितीतील महागाईचा विचार करता महापौर पारितोषिकाच्या रक्कमेमध्ये वाढ करणे बाबत समक्ष चर्चा झाली. सन २०११-२०१२ चे अर्थ संकल्पात सामान्य प्रशासन विभागांतर्गत विद्यार्थ्यांना "प्रोत्साहनपर बक्षिस देणे" या लेखाशिर्षकावर एकुण रक्कम रू. २५०००/- ची तरतुद करण्यांत आली आहे. त्यानुसार मार्च २०११ मध्ये व यापुढील वर्षात उत्तीर्ण होणा-या महानगरपालिका कर्मचारी यांचे पाल्यांना महापौर पारितोषिक म्हणुन खालील प्रमाणे पारितोषिक वितरण करणे योग्य होईल.

| अ.क्र. | इयत्ता १० वी (किमान ७०% किंवा त्यापेक्षा जादा गुण मिळविणा-या विद्यार्थ्याचे यादी मधील क्रमानुसार) | रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रथम पारितोषिक | रू.३१००/ |
| २ | द्वितीय पारितोषिक | रू.२५००/- |
| ३ | तृतीय पारितोषिक | रू. २०००/- |

| अ.क्र. | इयत्ता १२ वी (किमान ७०% किंवा त्यापेक्षा जादा गुण मिळविणा-या विद्यार्थ्याचे यादी मधील क्रमानुसार) | रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रथम पारितोषिक | रू.५१००/- |
| २ | द्वितीय पारितोषिक | रू.४१००/- |
| ३ | तृतीय पारितोषिक | रू.३१००/- |

सबब महानगरपालिका कर्मचा-यांचे पाल्यांना वरील प्रमाणे महापौर पारितोषिक म्हणुन अदा करणे बाबतचा प्रस्ताव सदरची बाब धोरणात्मक असल्याने मा.स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव सादर करणे बाबत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (सा.) :- अर्थसंकल्प २०११-१२ मध्ये वाढीव तरतुद मंजुर केली / नाही याबाबत मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल घेवुन सादर करावे.

मुख्यलेखाधिकारी :- सन२०११-१२ च्या अर्थसंकल्पात सामान्य प्रशासन विभागांतर्गत विद्यार्थांना प्रोत्साहनपर बक्षीस देणे या लेखाशिर्षाखाली एकूण रू.२५०००/- इतकी तरतुद केली आहे. **/अ**

मा.उपायुक्त (सा.) :- प्रस्तावीत **"अ"** प्रमाणे वाढीव बक्षीस रक्कम ठरविण्यास मा.स्थायी समिती समोर विषय मान्यतेस्तव ठेवणेस मंजुरीस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- कृ. चर्चा दि.९/८/२०११ , चर्चा केली मान्य दि.११/८/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिका कर्मचा-यांचे १० वी १२ च्या पाल्यांना महापौर पारितोषिक म्हणून वाढीव बक्षीस रक्कम ठरविणे आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- हा विषय चुकून आला का ?

सहाय्यक आयुक्त श्री. परशरामी साहेब :- नाही

मा.सौ.गायकवाड नि.व. :- मा.महासभा ठराव क्र.७५ दिनांक२९/३/२०११अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार कार्यवाही करणेत यावी.

मा.सौ. गंधे सु.म.:- महासभेचे ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेब :-मा.महासभा ठराव क्र.७५ दिनांक २९/३/२०११ अन्वये मा. महासभेचे मंजूरीनुसार कार्यवाही करण्यांत यावी.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी यांचे इयत्ता १० वी व १२ च्या परिक्षेत प्रथम प्रयत्नात ७० टक्के पेक्षा जादा गुण मिळवुन उत्तीर्ण झालेल्या मुलांना महापौर पारितोषिक म्हणून वाढीव बक्षीस रक्कम ठरविणे कामी मा. महासभा ठराव क्रमांक ७५ दिनांक २९/३/२०११ अन्वयेचे मंजूर ठरावानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंतराव सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमनताई मोहिनीराज. सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०३**

विषय क्रमांक-३४ शुक्रवार दिनांक २६/८/२०११

ठराव क्रमांक- ३४ शुक्रवार दिनांक २६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. अनिल बाबुराव घोडके, बिगारी यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अहमदनगर महानगरपालिका कामगार विभाग ३५९ दि.११/८/२०११

आरोपती कर्मचारी श्री. अनिल बाबुराव घोडके, बिगारी यांचेवरील आरोपपत्र क्र.१५७ दि.७/८/२०१० चे खातेनिहाय चौकशी अंती त्यांनी आरोप कबुल केल्याने व त्यांचे वरील आरोप शाबीत झाल्याने तसेच त्यांचा एकंदर गैरहजर कालावधी २१७४ दिवस व दि. २१/७/२००७ पासून सलग गैरहजरी पहाता त्यांना "तुम्हास मा. स्थायी समितीच्या मंजुरीने महानगरपालिका सेवेतुन काढून टाकण्यात येत आहे" अशी शिक्षा का करण्यात येवु नये याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर नोटीशीस त्यांनी दिलेला खुलासा असमाधानकारक असल्याने त्यांना सुचविलेली शिक्षा करणे योग्य असल्याने व सदरच्या शिक्षेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(१) (अ) मा. स्थायी समितीची पुर्व मान्यता आवश्यक असल्याने मा. स्थायी समितीसमोर घेणे कामी पुढील कार्यवाहीस्तव

येणेप्रमाणे प्रभारी कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मनपा सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ./ मा.श्री. भोसले ग.पुं./ मा.श्री. सातपुते दि.ना. :- श्री. घोडके आले आहेत. का ? त्यांना सभेत बोलवावे त्यांना पेन्शन बसेल का ?

मा.सभापती साहेब :- श्री. घोडके यांना सभेत बोलवावे.

त्याप्रमाणे श्री. घोडके सभेमध्ये हजर झाले.

मा.श्री. डागवाले कि.आ.:- त्यांना पेन्शन बसेल का ?

कामगार विभाग श्री. शित्रे :-आरोपती कर्मचारी यांची नेमणूक दिनांक ८/६/१९८९ अशी असून नेमणूक तारखे पासून ते दि.२१/७/२००७ पावेतो २१७४ दिवस वेळोवेळी गैरहजर होते. तसेच ते सन २००७ पासून वरिष्ठांची परवानगी न घेता गैरहजर आहेत त्याची १०वर्षे सर्व्हिस झालेली नसल्याने त्यांना पेन्शन बसणार नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ./ मा.श्री. लोंढे सु.सो. :- श्री घोडके हे आजारी आहेत त्यांना पॅरोलिसीसचा आजर झाला आहे. या प्रकरणी काय करता येईल.

कामगार विभाग श्री. शित्रे :- मा.सभेने निर्णय घ्यावा.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- कामावर घेणे बाबत ठरविल्यास मा. शासनाकडेस प्रकरण पाठविणार का ?

मा.श्री. जगताप नि. वि. :- यांना कामावर हजर करून घ्यावे.

कामगार विभाग श्री. शित्रे :- त्यांचे गैरहजर कालावधी बाबत मा. सभेने निर्णय घ्यावा लागेल.

मा.श्री. जगताप नि. वि. : गैरहजर कालावधीची त्यांना पगार भेटणार नाही.

मा.श्री.सप्रे द.ना.:- कर्मचा-यांवर वचक राहिल. कर्मचा-यांना चांगल्या सवई लागतील अशी कार्यवाही करावी.

मा.(प्र.)आयुक्त श्री.महेश डोईफोडे साहेबः- सदर कर्मचारी यांची मेडीकल करून त्यानुसार सभेने पुढील निर्णय घ्यावा.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- त्यांची मेडीकल करून मेडीकल रिपोर्ट पाहून त्यांना कामावर घेणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. गंधे सु. म.:- त्यांची मेडीकल करून मा. मेडीकल बोर्ड, पुणे यांचे फिटनेस सर्टिफिकेट पाहून त्यांना कामावर हजर करून घेण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- श्री.अनिल बाबुराव घोडके यांचे मा.मेडीकल बोर्ड, पुणे यांचे फिटनेस सर्टिफिकेट मागविण्यांत यावे व त्यानंतरच हजर करून घेणेबाबत उचित कार्यवाही करावी त्यांना कामावर हजर करून घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** श्री. अनिल बाबुराव घोडके, बिगारी यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी अंती सिध्द झालेने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढिल प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

श्री.अनिल बाबुराव घोडके, बिगारी हे आजारी असल्याने त्यांची मागील अनुपस्थितीचा (गैरहजर) कालावधी असाधारण रजा धरण्यांत यावी. तसेच मा. मेडीकल बोर्ड, पुणे यांचे फिटनेस सर्टिफिकेट मागविण्यांत यावे व त्यानंतरच हजर करून घेणेबाबत उचित कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंतराव. सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमनताई मोहिनीराज सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०३**

विषय क्रमांक-३५ शुक्रवार दिनांक २६/८/२०११

ठराव क्रमांक- ३५ शुक्रवार दिनांक २६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर दिनांक १/१०/२०११ ते दिनांक ३०/९/२०१२ या १२ महिन्याचे कालावधी करिता मा. शासनाचे दिनांक १९/४/२०११ चे परिपत्रकातील अटी नुसार जकात ठेक्याची देकार रक्कम रूपये ६०,९६,१५,०००/- निश्चित करून अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अहमदनगर महानगरपालिका जकात विभाग दिनांक २९/६/२०११

विषय - सन २०११- २०१२ करीता जकातीच्या ठेक्याची निविदा काढण्याबाबत.

सविनय सादर ,

विनंती पुर्वक रिपोर्ट देण्यात येतो की , अहमदनगर महानगरपालिकेने सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचा जकातीचा ठेका देकार रक्कम रु. ५८,०५,०९,४९४ /- इतकी देकार रक्कम निश्चीत करुन रितसर जाहीर निविदा प्रसिध्द करण्यास मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव कार्यालयीन प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता .

जकात अभिकर्ता नेमणुक प्रक्रियेमध्ये वर्तमान पत्रांतुन चार वेळेस जाहीर निविदा मागावुन देखील त्यास काहीही प्रतिसाद मिळाला नसल्याने मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.६२ दि.३०.८.२०१०अन्वये - कार्यालयीन प्रस्तावामध्ये जकातीची देकार रक्कम रु. ५८,०५,०९,४९४ /- धरलेली असताना स्थायी समिती सभेने सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाकरीता जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी मा. सर्व साधारण ठराव क्र.२ दि. २०.१.२००९ अन्वये प्राप्त देकार रक्कम रुपये ४८ कोटी ६ लाख व इमारत फंड रु. १ कोटी ४० लाख या रक्कमेवर १० % (दहा टक्के) वाढवुन येणारी रक्कम रु. ५२,८६,६०,००० /- व युआयडीएसएसएमटी फेज -२ या योजने अंतर्गत पुर्ण करावयाच्या कामासाठी महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी रु.१ कोटी ५४ लाख या प्रमाणे देकार रक्कम निश्चीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे अशाबाबत ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

उक्त ठरावा नुसार सन२०१०-११ करीता जकातीचे ठेक्यासाठी देकार रक्कम रु. ५२,८६,६०,००० /- निश्चीत करुन स्थानिक जिल्हास्तरीय , राज्यस्तरीय दैनीक वर्तमान पत्रांतुन पाचव्यांदा जाहीर निविदा प्रसिध्द केली असता, महानगरपालिकेने निश्चीत केलेल्या देकार रक्कमेपेक्षा जास्त दराची म्हणजेच रु.५३,०१,००,०००/- ची निविदा व निविदा अटी शर्तीनुसार मा. शासनाचे युआयडीएसएसएमटी या योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या हिश्यापोटी रक्कम रु.१.५४ कोटी देण्यास तयार असल्याबाबत मे. सहकार ग्लोबल प्रा.लि. प्रा.लि. मालाड यांनी तयारी दर्शविल्याने मा.स्थायी समिती ठराव क्र.६६ दि. १८ /९ /२०१०अन्वये दि. १.१०.२०१० ते दि.३०.९.२०११ या एक वर्षाचे कालावधी करीता मे.सहकार ग्लोबल प्रा.लि.मालाड ,मुंबई यांची जकात अभिकर्ता म्हणुन नेमणुक केलेली आहे.

सदर ठेक्याचा एक वर्षाचा कालावधी दि. ३०.९.२०११ रोजी संपुष्टात येत आहे, मा. स्थायी समिती ठराव क्र. ६६ दि. १८.९.२०१० नुसार पुढील वर्षी महानगरपालिका हद्दीत जकात पात्र मालावर जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी जाहीर निविदा प्रक्रिया जकात ठेक्याची मुदत संपण्यापुर्वी तीन महिने अगोदर पासुनच सुरु करण्यात यावी असा ठराव पारीत करण्यात आलेला असल्याने दि.१.१०.२०११ ते ३०-९-२०१२ या एक वर्षाचे कालावधीकरीता जकात वसुली करणे कामी

ठेका देण्यासाठी जाहीर निविदा मागविणे आवश्यक आहे.अ.नगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे दृष्टीने आर्थीकदृष्ट्या लाभाचे आहे. कारण खाजगी तत्वावर असलेल्या यंत्रणा म्हणजे कर्मचारी यांचे वेतन, वाहने व इतर तदनुषंगीक खर्च, संगणीकीकरण, दुरध्वनी,भ्रमणध्वनी यंत्रणा या बाबींची प्रशासनाकडुन पुर्तता होऊ शकणार नाही तसेच शहरात असणा-या जकात चोरीचा मागील अनुभव पाहाता पुर्णपणे बिमोड प्रशासनाकडुन होऊ शकत नाही.तसेच या कामात वारंवार होणारे हस्तक्षेप व अडथळे यांना पायबंध घालता येणार नाही.त्यामुळे महानगरपालिके मार्फत जकात वसुलीचे काम केल्यास ठेकेदाराकडुन मिळणा-या अपेक्षीत उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही जकात वसुली ठेका पध्दतीने दिल्यास अपेक्षीत उत्पन्नापेक्षा अधिक रक्कम मिळु शकते हे मागील कालावधी मध्ये दिलेल्या ठेक्यावरुन सिध्द होते.महानगरपालिकेकडील नाका कर्मचारी सध्या इतर विभागांत वापरण्यांत येऊन नागरीकांना सुविधा देणे, घरपट्टी वसुली इतर सोर्योस्कर कामे त्यांना देऊन त्यांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यांत येत आहेत.महानगरपालिकेमार्फत जकात कराची वसुली करावयाची झाल्यास जकात नाक्यासाठी लागणारे महानगरपालिकेचे कर्मचारी सुमारे २५० ते ३०० लागणार आहेत.

मा. शासनाने शासन परीपत्रक क्र. जकात २०११ / प्र.क्र. ११ / नवि - ३४ दि. १९ एप्रील २०११ अन्वये जकात अभिकर्ता नेमणुकीबाबत कार्यपध्दती नमुद केलेली आहे त्यामध्ये मुद्दा क्र. १ बाब ब नुसार देकार रक्कम निश्चीत करताना पुर्वीच्या वर्षामध्ये जास्तीत जास्त ज्या रक्कमेचा देकार प्राप्त झाला होता व ज्या रक्कमेस जकात / पारगमन शुल्क वसुलीचा ठेका निश्चीत करण्यात आलेला होता त्या रक्कमेमध्ये १५ % वाढ करण्यात यावी व ही रक्कम किमान देकार रक्कम म्हणुन निश्चीत करण्यात यावी व सदरील परिपत्रकातील मुद्दा क्र.VIIIमधील`**अ**`नुसार निविदा केवळ एका मानकावर म्हणजेच जास्तीत जास्त देकार या निकषावर मागविण्यात यावी अशाबाबत निर्देश दिलेले आहेत , त्यानुसार सन २०११-२०१२ या कालावधीकरीता जकातीची निविदा प्रसिध्द करावयाची झाल्यास देकार रक्कम निश्चीत करताना मागील वर्षात जकात अभिकर्ता यांचेमार्फत महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या सर्वाधीक देकार रक्कम रुपये ५३,०१,००,००० /- या रक्कमेमध्ये १५% वाढ रुपये ७,९५,१५,०००/- अशी एकुण देकार रक्कम रुपये ६०,९६,१५,०००/- ही किमान देकार रक्कम निश्चीत करुन त्याप्रमाणे जाहिर निविदा मागविण्यासाठी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ अनुसुची ड मधील प्रकरण ८ कराधान नियम ३५ अन्वये मा.स्थायी समितीच्या मान्यतेने अभिकर्ता निश्चीतीची तरतुद आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ०१/१०/२०१० ते ३०/०९/२०११ | ५२,७७,३५,९०४ /-<br>१० % वाढ + ५,२७,७३,५९० /-<br>किमान देकार रक्कम ५८,०५,०९,४९४ /- | प्राप्त देकार रक्कम रूपये ५३,०१,००,०००/- ( चार वेळेस निविदा प्रसिध्द करुन ही त्यास काहीही प्रतिसाद न मिळाल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र. ६२ दि. ३०.८.२००१० अन्वये देकार रक्कम रूपये ५२,८६,६०,०००/- निश्चीत करण्यात आलेली आहे. ) |
| २) | ०१/१०/२०११ ते ३०/९/२०१२ | ५३,०१,००,००० /-<br>१५ % वाढ + ७,९५,१५,००० /-<br>किमान देकार रक्कम ६०,९६,१५,००० /- | |

सन २०११-१२ या कालावधीसाठी जकातीचा ठेका देण्यासाठी वरील प्रमाणे ठेक्याची देकार रक्कम ठरविण्यास्तव मा.शासनाच्या सुधारीत परीपत्रकानुसार खालील अटी शर्ती करारात समाविष्ट करणे उचीत वाटते.

**अट क्र. १)**जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकाने पुर्वी किमान एका महानगरपालिकेमध्ये जकात / पारगमन शुल्क वसुली अभिकर्ता म्हणुन पुर्वी काम केलेले असावे,किंवा शासनांतर्गत टोल टॅक्स गोळा करणारे अभिकरण म्हणुन काम केलेले असावे.

**२)** जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकाने पुर्ण झालेल्या लगतच्या मागील तीन वर्षात म्हणजेच २००८-२००९, २००९-२०१० , २०१०-२०११ या प्रत्येक वर्षात किमान देकार रक्कमे इतक्या आर्थिक रक्कमेची उलाढाल केलेली असावी व त्यासाठी तीन वर्षाचे लेखा परीक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

**३)** जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकाची भांडवली स्थिती किमान देकार रक्कमेच्या किमान ५ टक्के इतकी असावी व त्यासाठी सन २०१०-२०११ या अर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यात आलेले लेखा विवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

**४)** संयुक्तपणे (JOINT VENTURE ) सादर केलेली निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**५)** जकात ठेक्याच्या कालावधीत नगरोत्थान / युआयडीएसएसएमटी / नाट्यगृह बांधकाम योजनेअंतर्गत महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी पुर्ण करावयाचे कामासाठी रक्कम रु. २ कोटी इतकी रक्कम निविदा धारकास निविदे व्यतीरीक्त भरणे बंधनकारक राहील.

**६)** निविदेसोबत इसारा रक्कम ही १० लक्ष इतकी भरण्यात यावी ,

**७)** यशस्वी अभिकर्त्यास किमान देकार रक्कमेच्या १०% एवढ्या रक्कमेची बॅक गॅरेंटी महानगरपालिकेकडे सुरक्षा ठेव म्हणुन ( सिक्युरेटी डिपॉझीट ) ठेवावी लागेल .

**८)** शासनाने लागु केलेल्या सवलतीचा प्रतिपुर्ती चा ठेकेदारास अनुज्ञेय असणार नाही.

**९)** काचेच्या बांगड्यावरील जकात कर माफीस मा. शासनाने मान्यता दिल्यास त्याकामी दिल्या जाणा-या सवलतीचा मोबदला ठेकेदारास अनुज्ञेय असणार नाही.

**१०)** ठेक्याचे कालावधीत प्रचलीत पारगमन पास फी अथवा जकात दरामध्ये मा. शासनामार्फत वाढ करण्यात आल्यास सदर वाढी नुसार उत्पन्नात होणारी तफावत ठेकेदारास देणे बंधनकारक राहील .

**११)** ठेक्याचे कालावधीमध्ये अभिकर्त्याने वसुल केलेल्या जकात / पारगमन शुल्काची रक्कम ही महानगरपालिका व अभिकर्त्याचे संयुक्त एस्क्रो अकाऊंट कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत उघडुन त्यामध्ये जमा करणे आवश्यक राहील.

**१२)** निविदा तीन लिफाफा पध्दतीमध्ये खालील प्रमाणे देण्यात यावी.

१) पहिला लिफाफा इसारा रक्कमेसाठी असावा.

२) दुसरा लिफाफा तांत्रीक मुल्यांकनाबाबतीत असावा.

३) तिसरा लिफाफा आर्थिक देकारासाठी असावा.

**१३)** ठेक्याच्या कालावधीत जकात वसुली संदर्भात कोणत्याही वादाबद्दल निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना राहातील.

**१४)** कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा नाकारण्याचे , फेटाळण्याचे व राखुन ठेण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहतील .

तरी उक्त प्रमाणे जकात ठेक्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे धोरणात्मक निर्णयास्तव ठेवण्याबाबत पुढील योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे जकात अधिक्षक यांचा अहवाल असे.

--**--

मुख्य लेखा परिक्षक :- प्रस्तावीत केल्याप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त (सा./क) :- अहवालानुसार प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

मा.आयुक्त साहेब :- मा. शासनाचे १९/४/२०११ चे परिपत्रकातील अटीनुसार या वर्षाची निविदा प्रसिध्द करावी लागेल त्यातील अटी व शर्तीमध्ये कोणतीही बदल कामा येणार नाही मा.स्थायी समितीपुढे निर्णयार्थ ठेवा. दिनांक २८/७/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

मा.सभापतीसाहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये आयात होणा-या जकात पात्र मालावर जकात वसुलीकामी ठेक्याची देकार रक्कम निश्चित करून अभिकर्ता नेमणेकामी जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सभेपुढे सादर झालेला आहे. तथापी स्थायी समितीची सभा होण्यापुर्वी सभापती या नात्याने जकात अभिकर्ता चे संचालक यांनी जकात ठेक्याची पुढील एका वर्षासाठी मुदतवाढ सद्याच्या देकार रक्कमेवर नैसर्गीक अपेक्षीत वाढ देण्यास तयार आहे असे स्पष्ट सुचीत केले आहे, व सदर चे पत्र मा. स्थायी समितीपुढे विचारात घेऊन योग्य तो निर्णय घेण्याची विनंती केलेली आहे. सदरची बाब ही विषय क्र. ३५ च्या संबंधीत असल्याने व सर्व मा. सदस्यांना याचा स्पष्ट खुलासा व्हावा याकरीता सदरचे पत्र या सभेमध्ये वाचुन त्यावर सल्ला मसलत करावी अशाबाबत सुचीत करते.

त्यानुसार स्थायी समिती क्लार्क यांनी प्रस्तावाचा विषय संपुर्णपणे मा. स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना वाचुन दाखविला तसेच सर्व मा. सदस्यांनी सभापती कडे सद्याचे जकात अभिकर्ता यांनी दि. २४.८.२०११ चे पत्र परवानगी दिल्याने सदरचे पत्र सभेपुढे वाचुन दाखविले सदर पत्रातील थोडक्यात आशय पुढील प्रमाणे.-

"महोदय ,

वरील विषयास अनुरून विनंती पुर्वक कळविण्यांत येते की,आमची संस्था ही अहमदनगर महानगरपालिका मध्ये जकात अभिकर्ता म्हणुन कार्यरत आहे.आम्ही मागील एक वर्षाचा ठेका५३.०१कोटी व यु.आय.डी.एस.एस.एम.टी या योजनेचे १.५४ कोटी मध्ये घेतलेला आहे. सदर जकात ठेक्याची मुदत दि.३०/९/२०११ पर्यत आहे.

अहमदनगर शहरामध्ये महानगरपालिका हद्दीत व्यापारी व स्थानिक जकात तस्कर यांच्या मार्फत जकात चो-या मोठया प्रमाणांत होत असुन ब-याच वेळेस आमच्या कर्मचा-यांकडून यास आळा बसविण्याचा प्रयत्न करताना, त्यास अटकाव करताना आमचे कर्मचा-यांना गंभीर मारहाण झालेली असून जिवे मारण्याचे प्रयत्न झालेले आहेत. याबाबत आम्ही अनेक लेखी तक्रारी संबंधीत पोलीस विभागाकडेस नोंदविलेल्या आहेत. असे असताना आम्ही व्यापा-यांशी समन्वय ठेवुन व्यापारी वर्गाशी कटुता निर्माण न होउ देता जकात वसुलीचे काम सुरळीतपणे चालू ठेवलेले आहे. तसेच नागापुर ते औरंगाबाद कडे जाण्यास व येण्यास बाहयवळण रस्ता तयार झालेला असल्याने दररोज सुमारे ७००ते ८०० वाहने सदर मार्गाने निर्गमीत होउ लागल्याने पारगमन फी वसुलीच्या प्रमाणात मोठी घट निर्माण झालेली आहे. असे असताना ही आम्ही करारानुसार निश्चित केलेली साप्ताहीक हप्त्याची रक्कम विहीत वेळेत महानगरपालिकेकडेस वर्ग केलेली आहे. सध्याचा जकातीचा ठेका चालवित असताना

आमचे जकातीचे मध्यवर्ती गोडावुनला मोठी आग लागुन आमचे खुप मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे.

पुढील एका वर्षाकरीता म्हणजेच दि.१/१०/२०११ ते ३०/९/२०१२ चा जकातीचा ठेका मागील ठेक्याच्या रक्कमेमध्ये अपेक्षीत नैसर्गीक वाढ मिळवुन आमच्या संस्थेला वरील सर्व बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करून वरील कालावधीचा जकातीचा ठेका आमच्या संस्थेला देण्यांत यावा. सहाकार्य अपेक्षीत आहे." याप्रमाणे संचालक सहकार ग्लोबल प्रा.लि. यांचे दि.२४/८/२०११ रोजीचे पत्र असे

मा.श्री. भोसले ग.पुं. :- अभिकर्ता संस्थेच्या पत्राप्रमाणे मुदतवाढ देता येईल का ?

मा.(प्र.)आयुक्त श्री. महेश डोईफोडे साहेबः- अशा रितीने मा.शासनाचे परिपत्रकामध्ये उल्लेखिलेल्या कारणा व्यतिरिक्त मुदतवाढ देता येणार नाही.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- सदर परिपत्रकामधील मुदत वाढीबाबत तरतूदी सभेपुढे वाचून दाखवाव्यात.

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- मा. शासनचे परिपत्रकानुसार करारनाम्याच्या सर्वसाधारण अटी व शर्ती- करारनाम्याचा कालावधी हा कोणत्याही परिस्थितीत एक वर्षा पेक्षा जास्त असू नये. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये उदा. निवडणूकीची आचारसंहिता, नैसर्गिक आपत्ती, इत्यादी कारणांमुळे हा कालावधी वाढविण्याची गरज भासल्यास व संबंधीत अभिकर्त्याने यास सहमती दर्शविल्यास फक्त तेवढया कालावधीसाठी अशी वाढ सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने अनुज्ञेय राहील.

मा.श्री. डागवाले कि. आ. :- यापुर्वी मुदतवाढ दिली ? होती का ? त्यास मा. शासनाची मान्यता घेण्यात आली होती का ?

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- सन २००६-२००७ मध्ये ६ महिन्याकरीता मुदतवाढ दिली होती. मागील वर्षी ५ वेळेस निविदा काढून ही प्रतिसाद न मिळाल्यामुळे १ महिन्याची व नंतर १ महिन्यांची अशी दोन वेळा मुदतवाढ दिलेली आहे. मुदतवाढीबाबत मा. शासनाच्या दि. २१.९.२००६ व दि. २.२.२००९ चे पत्र वाचुन दाखविण्यात आले.

मा.श्री. भोसले ग.पुं :- मागील वर्षी देकार रक्कम कमी केली होती? किती रक्कमेस मागील वेळी ठेका गेला होता.

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- मागील वर्षी ४ वेळेस निविदा मागवून ही प्रतिसाद न मिळाल्यामुळे देकार रक्कम रूपये ५८ कोटी वरून ५२.८६ कोटी करण्यात आली आणि त्यानंतर ५३ कोटी जकात ठेका दिला होता.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- महापालीकेने यापुर्वी वेळोवेळी जकात अभिकर्ता नेमण्या संबंधी केलेले प्रयत्न व त्यावेळेस महानगरपालिकेचे झालेले आर्थीक नुकसान व सद्यपरीस्थीतीत जकात अभिकर्ता हा मागील वर्षाच्या देकार रक्कमवर १५ टक्के वाढ देण्यास तयार आहे व महानगरपालिकेने प्रस्तावीत केलेली देकार रक्कम याचा विचार करता शासनाच्या परीपत्रकाप्रमाणे सदरची बाब ही अपवादात्मक परीस्थीतीत मोडत आहे, मागील वर्षात पांच वेळा निविदा मागवूनही कुणी निविदा भरीत नाहीत. आपले तेव्हा ६ कोटीचे नुकसान झाले होते. याकरिता देकार रक्कम रू. ६०,९६,१५,०००/- व अटी व शर्ती नुसार २ कोटी रूपये

मनपा विकास कामाकरिता म.न.पा.स देणे बंधनकारक करून सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना मुदतवाढ दयावी.

मा.(प्र.)आयुक्त श्री. महेश डोईफोडे साहेब :- सदर प्रस्तावास प्रशासनाने रक्कम रु. ६०,९६,१५००० /- ही देकार रक्कम निश्चीत केलेली आहे, जकात ठेक्याची रक्कम निश्चित करून अभिकर्ता नेमणे कामी जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. त्याप्रमाणे मंजूरी द्यावी. जकात अभिकर्ता नियुक्त बाबत अधिकार हे मा. स्थायी समितीस प्राप्त असल्याने याबाबत मा.सभेने निर्णय घ्यावा.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ५ वेळेस निविदा मागुन प्रतिसाद मिळाला नाही. मागील वेळी ६ कोटीचे नुकसान झाले आहे. साई एंटरप्राईजेस अभिकर्त्याचा अनुभव वाईट आहे त्यांचा व्यापा-यांना बराच त्रास झाला. त्यांनी आमचे कडेस तक्रारी केल्या होत्या. मात्र सहकार ग्लोबल प्रा.लि. यांचे बाबत तक्रारी दिसुन येत नाही.

मा.श्री. लोंढे सु.सो.:- शहरातील अतिक्रमण काढणे, रस्ता रूंदीकरण मोहिमेमुळे बाजार पेठ उध्दस्त होत आहे. बाजारपेठ शहराबाहेर जात आहे याकरीता ठेकेदार यांनी दिलेल्या पत्राचा विचार करावा..

मा.(प्र.)आयुक्त श्री.महेश डोईफोडे साहेब:- जकात ठेक्याचे कालावधीत नगरोत्थान/ यु.आय.डी. एस.एस.एम.टी./नाटयगृह बांधकाम योजने करिता मनपाचे हिश्शापोटी करावयाचे कामासाठी रक्कम रू. २ कोटी इतकी निविदा व्यतिरिक्त निविदा कारास भरणे आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- मा. महापौर यांचे निवासस्थानाचे बांधकामाकरिता ही रक्कम म्हणून घेणेत यावी.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ठेकेदार १५% वाढीव रक्कम देणेस तयार आहे का ?

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- अपेक्षित नैसर्गिक वाढ देण्यास तयार आहे. अशाबाबत त्यांनी त्यांचे पत्रामध्ये उल्लेख केलेला आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ठेक्याची रक्कम किती होते ते सांगावे.

जकात विभाग वरिष्ठ लिपिक श्री. सारसर :- प्रस्तावाप्रमाणे जकातीची रक्कम रूपये ६०कोटी ९६लाख १५ हजार व युआयडीएसएसएमटी / नगरोत्थान / नाट्यगृह बांधकाम या योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या हिश्श्यापोटी रक्कम रू.२ कोटी निविदे व्यतीरीक्त भरणे बंधनकारक रहाणार आहे.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- जकात ठेकेदार सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना जकात देकार रकमेनुसार रूपये ६०कोटी ९६लाख १५ हजार ठेका देण्यांस मंजूरी द्यावी.

मा.सौ.गंधे सु.म.:- जकात देकार रकमेनुसार रूपये ६०कोटी ९६लाख १५ हजार चा रकमेस अटी व शर्ती नुसार सहकार ग्लोबल प्रा.लि. ठेका देण्यांत यावा. व महानगरपालिकेचे नगरोत्थान , यु.आय.डी.एस.एस.एम.टी योजना व मा. महापौर निवास बांधकामाकरीता रक्कम रूपये २ कोटी मनपास देणे बंधनकारक राहील.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केलेली परिस्थितीचा विचार करता , सन २००९ -१० या कालावधीसाठी निश्चीत केलेली देकार रक्कम रु. ५८.१६ कोटी याबाबत निविदा मागविली असता सदर निविदेस अल्प प्रतिसाद मिळालेला आहे, व सदरच्या निविदा वेळोवेळी प्रसिध्द केल्याने महानगरपालिकेचा सुमारे १५ लक्ष इतका जाहीरात खर्च आलेला आहे, व निविदा प्रसिध्द करुनही अल्प प्रतिसाद मिळाल्याने देकाराची रक्कम रु. ४८.०६ कोटी करावी लागली व यामध्ये महानगरपालिकेचे सुमारे १० कोटीचे नुकसान झालेले आहे.

तसेच सन २०१०-११ मध्ये जकात अभिकर्ता नेमण्यासाठी देकार रक्कम रु. ५८.०५ कोटी निश्चीत करुन निविदा मागविण्यात आल्या असता त्यास ही अल्प प्रतिसाद मिळाल्याने महानगरपालिकेला सदर निविदा ४ वेळेस प्रसिध्द कराव्या लागल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र. ६२ दि. ३०.८.२०१० ने देकार रक्कम कमी करुन ५२.८६ कोटी करण्यात येऊन प्रसिध्दी देण्यात आली . त्यावर्षी ही महानगरपालिकेस जवळपास ६ कोटीचे नुकसान झालेले आहे.

तसेच यापुर्वी महानगरपालिकेचे तीन वर्षाचे जकातीचे उत्पन्न व त्याची सरासरी पहाता जकात अभिकर्त्याने देऊ केलेली जकातीची रक्कम व शासनाने यापुर्वी दिलेले मार्गदर्शन तसेच यापुर्वी महानगरपालिकेचे झालेले आर्थीक नुकसान व जकात अभिकर्ता यांनी देऊ केलेली देकार रक्कमेचा विचार करता सदरची बाब ही शासनाच्या परीपत्रकानुसार अपवादात्मक परीस्थितीमध्ये मोडत आहे, महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होऊ नये , तसेच मा. स्थायी समितीच्या सदस्यांनी मांडलेल्या मतांचा व शासनाचे परीपत्रकातील मार्गदर्शनाचा तसेच जकात अभिकर्त्याकडुन समस्त व्यापारी व नागरीकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होत नसल्याने व शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यामध्ये कोणताही बदल न करता , व गेल्या दोन वर्षामध्ये निविदेस मिळालेला अल्प प्रतिसाद याचा विचार करता नविन निविदा प्रसिध्द करुन भविष्यकाळात महानगरपालिकेचे होणारे आर्थीक नुकसान टाळण्याच्या हेतुने मा.स्थायी समितीचे सर्व सदस्यांचे संमतीने जकात ठेका मागील वर्षाच्या रकमेमध्ये १५% वाढ करून येणारी देकार रक्कम रूपये ६०,९६,१५,०००/- व नगरोत्थान, यु.आय.डी.एस.एस.एम.टी. योजना, नाटयगृह बांधकाम व महापौर निवास्थाना करिता रक्कम रूपये २ कोटी मनपास देणे कार्यालयीन अटीनुसार बंधनकारक करावे लागेल. याप्रमाणे सभागृहातील सन्माननीय सदस्य यांचे चर्चेनुसार जकात वसुलीचा ठेका सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना देण्यांत यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेली व्यापक चर्चेनुसार ठरविण्यांत येते की, दिनांक १/१०/२०११ ते दिनांक ३०/९/२०१२ या १२ महिन्याचे कालावधी करिता जकात ठेक्याची देकार रक्कम रू.६०,९६,१५,०००/-(रूपये साठ कोटी शहाण्णव लाख पंधरा हजार मात्र)निश्चित करणेस व महानगरपालिकेचे नगरोत्थान,यु.आय.डी.एस.एस.एम.टी.योजना, नाटयगृह बांधकाम **व** महापौरांचे निवासस्थानाचे बांधकामाकरिता रक्कम रूपये दोन कोटी मनपास देणे बंधनकारक करणेस ऑफिस रिपोर्ट नुसार ही सभा मान्यता देत आहे.

गेल्या  खेपेस जकात ठेका वसुली कामी जाहिर निविदा चार वेळेस प्रसिध्द करून ही प्रतिसाद मिळाला नव्हता व त्यामुळे जकात देकार रक्कम कमी करावी लागल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान देखील झाल्याचे दिसून येत असल्याने अशा परिस्थितीच्या पुर्वानुभव लक्षात घेता. सर्वानुमते ठरविण्यांत येते की, दिनांक १/१०/२०११ ते दिनांक ३०/९/२०१२ या कालावधी करिता  जकात देकार रक्कम रूपये ६०,९६,१५,०००/- (रूपये साठ कोटी शहाण्णव लाख पंधरा हजार मात्र) या जकात देकार रकमेस तसेच महानगरपालिकेचे नगरोत्थान,यु.आय.डी.एस.एस.एम.टी.योजना, नाटयगृह बांधकाम **व** महापौरांचे निवासस्थानाचे बांधकामाकरिता रक्कम रूपये दोन कोटी महानगरपालिकेच्या हिश्शापोटी करावयाचे कामाकरिता देकार रकमे व्यतिरिक्त महानगरपालिकेला देणे यानुसार जकात वसुलीबाबत पुढील एक वर्ष मुदतवाढ  नियमानुसार देता येत असल्यास त्यास ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार जकात वसुलीचे कामी मे.सहकार ग्लोबल प्रा.लि. मालाड, मुंबई यांना एक वर्ष मुदतवाढ  देण्यांस ही सभा  सर्वानुमते मान्यता देत आहे.
नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा. सौ.गायकवाड निलीमा वसंतराव     सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गंधे सुमनताई मोहिनीराज.     सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका